# ३. महाराष्ट्र खासगी वने (संपादन) अधिनियम, १९७५

## (१९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९)

या अधिनियमास राष्ट्रपती यांची दिनांक २५ ऑगस्ट १९७५ रोजी अनुमती मिळाली. त्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग चार, यामध्ये दिनांक २० ऑगस्ट १९७५ रोजी तो प्रथम प्रसिद्ध करण्यात आला.

या अधिनियमात पुढील अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्या आहेत:

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२* (१ ऑक्टोबर १९७५)§

सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४† (२६ एप्रिल १९७८)§

सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ (१२ फेब्रुवारी १९८०)§

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ (६ फेब्रुवारी १९९८)§

**राज्यातील खाजगी वनांचे संपादन करण्यासाठी आणि इतर विवक्षित बाबींची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

१[**ज्या अर्थी,** राज्यातील वन जमीन पुरेशी नाही;

**आणि ज्या अर्थी,** राज्यातील खासगी वने ही सर्वसाधारणपणे अतिशय दर्जाहीन व अत्यंत वापरलेली अशी आहेत आणि त्यांचा शेतीवर व शेतीवरील अवलंबित व्यक्तीवर वाईट परिणाम होतो;

**आणि ज्या अर्थी,** सर्वसाधारणपणे महाराष्ट्र राज्यातील खासगी वनातील महत्त्वाच्या साधनसंपत्तीचे जतन करण्यासाठी आणि त्यांच्या मालकांकडून ती नष्ट केली जाऊ नयेत किंवा त्यांचे अत्यधिक शोषण केले जाऊ नये यासाठी आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने पर्यावरण समतोल साध्य करण्याच्या व तो राखण्याच्या प्रयोजनार्थ,

---

* सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ हा सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२ याच्या कलम ६ द्वारे निरसित करण्यात आला.

† सन १९७८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ हा सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ५ द्वारे निरसित करण्यात आला.

§ ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

१. सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२, कलम २ द्वारे मूळ उद्देशिकेऐवजी ही उद्देशिका नेहमीसाठी घातली असल्याचे मानण्यात येईल.

अशा वनांचा पद्धतशीर व शास्त्रीय दृष्टीने होणारा विकास व व्यवस्थापन यांना चालना देण्याकरिता, ग्रामीण जनतेची आणि विशेषत: जे सर्वसाधारणपणे वन क्षेत्रात रहातात असे आदिवासी व इतर मागासवर्गीय जमाती यांची सामाजिक-आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी, चरण्याच्या प्रयोजनासाठी योग्य असणाऱ्या वनांचा कुरण म्हणून विकास करण्यासाठी, खासगी वनांचा भाग ग्रामीण समाजाकडे सोपवण्यासाठी वन क्षेत्रे आणि खालच्या पातळीवरील शेत जमिनींची धूप होण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी पाण्याची रेजिम (वॉटर रेजिम) सुधारण्यासाठी आणि पाण्याचे वाढविण्यासाठी, धरणे व तलाव यांमधील गाळ साचलेला कमी करण्यासाठी, वन उत्पादनांचे सर्व हिताच्या दृष्टिकोनातून वितरण करण्यासाठी आणि सर्वसामान्यांना अहितकारक ठरेल अशा प्रकारे वन उत्पादनांचे केंद्रीकरण होण्यास प्रतिबंध करण्यासाठी, वापरण्यायोग्य तयार वन उत्पादने सर्व हितासाठी योग्य ठरतील अशा प्रकारे वितरित करण्यासाठी, वनांवर आधारित रोजगारांच्या संधीत वाढ करण्यासाठी, इतर गोष्टींबरोबरच गाईच्या शेणावर अवलंबून राहणे कमी करण्यासाठी वन उत्पादनांच्या, तसेच जळाऊ लाकडाच्या गरजा भागवणे आणि विशेषत: जेथे शक्य असेल तेथे शास्त्रीय तत्त्वावर खासगी वनांचे वनरोपण करण्यासाठी आणि त्याद्वारे मातीचे संरक्षण करण्यासाठी, पाणी टिकवून ठेवण्यासाठी, धूप होण्यास प्रतिबंध करण्यासाठी परिस्थिती निर्माण करण्यासाठी, आणि अशा खासगी वनातील आणि राज्यातील इतर जमिनीतील शेतीच्या आणि शेतकऱ्यांच्या सर्वोत्तम हिताच्या दृष्टीने जमिनीची आणि जमिनीखालील पाण्याच्या साधन मार्गांची सुधारणा करण्यासाठी आणि [१][अशा प्रयोजनांसाठी] योजना हाती घेण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील खासगी वने संपादित करणे इष्ट आहे;

**आणि ज्या अर्थी,** ज्यांच्या वन जमिनींचे या अधिनियमान्वये संपादन केल्यामुळे ज्या खासगी वनांच्या मालकांची (ज्यांच्या जमिनी दगड खाणींसारख्या गौण खनिजांच्या खननासाठी वापरण्यात आल्या होत्या असे मालक वगळून) एकूण धारण जमीन नियत दिनांकाला बारा हेक्टरांपेक्षा कमी झाली असेल किंवा ज्यांची एकूण धारण जमीन नियत दिनांकाच्या लगतपूर्वी बारा हेक्टरपेक्षा कमी असेल त्यांच्याबाबतीत, त्यांची एकूण जमीन बारा हेक्टर किंवा, यथास्थिति, त्याहून कमी होऊन त्यांना अशा जमिनीतून त्यांच्या उपजीविकेसाठी उत्पन्न मिळणे शक्य व्हावे यासाठी, अशाप्रकारे संपादित केलेल्या जमिनीतून त्यांची संपूर्ण वनजमीन किंवा तिचा भाग परत मिळावी यासाठी सुद्धा तरतूद करणे आणि यात यापुढे आलेल्या इतर विशिष्ट प्रयोजनांसाठी तरतूद करणे इष्ट आहे;]

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सव्विसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :

---

१. सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला.

## १. संक्षिप्त नाव, व्याप्ती आणि प्रारंभ.

(१) या अधिनियमास, "महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे राज्य शासन नेमील अशा दिनांकापासून अमलात येईल.

### टिप्पणी

महाराष्ट्र खासगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ (१९७५ चा अधिनियम क्र. २९) या १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२ द्वारे सुधारणा करण्यात आलेल्या अधिनियमाच्या वैधतेला **जनू चंद्रा वि. महाराष्ट्र राज्य एआयआर १९७८ मुंबई ११९ एफ.बी.** या प्रकरणात आव्हान देण्यात आले होते. उच्च न्यायालयाने या अधिनियमाची वैधता कायम केली. मात्र असे जरी असले तरी उच्च न्यायालयाने विनंती अर्जदाराचा विनंती अर्ज स्वीकारला होता.

## २. व्याख्या.

(२) संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,-

(क) "नियत दिवस" याचा अर्थ, ज्या दिनांकास हा अधिनियम अमलात येईल तो दिनांक, असा आहे;

(ख) "संहिता" याचा अर्थ, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१), असा आहे.

(ग) "जिल्हाधिकारी" या संज्ञेमध्ये या अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाकडून नियुक्त करण्यात आलेल्या, उप-जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याचा समावेश होतो;

[१][(ग-एक) "वन" याचा अर्थ, नैसर्गिकरीत्या वाढलेली किंवा माणसांनी लावलेली आणि मानवी प्रयत्नाने किंवा त्याखेरीज अस्तित्वात असलेली किंवा काळजी घेण्यात येत असलेली झाडे (मग ती उभी असोत, पाडलेली असोत, आढळून आलेली असोत, किंवा अन्यथा असोत), झुडपे किंवा जंगली वनस्पती, यांचा समावेश असलेला जमिनीचा पट्टा, अथवा ज्या जमिनीवरील वनस्पतीच्या अशा वाढीमुळे इमारती लाकूड, इंधन, वनोत्पादन

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२ याच्या कलम ३ द्वारे खंड (ग-एक) नेहमीसाठी घातला असल्याचे मानण्यात येईल.

यांचा पुरवठा किंवा गुरे चारण्याची सुविधा यांवर किंवा हवामानावर किंवा ओढ्याच्या प्रवाहावर, धूप होण्यापासून जमिनीचे संरक्षण होण्यावर किंवा अशा अन्य बाबींवर परिणाम होण्याची शक्यता असेल असा जमिनीचा पट्टा, असा आहे आणि यात पुढील जमिनींचा समावेश होतो:–

(एक) वन झाडांच्या खोडांनी व्याप्त असलेली जमीन;

(दोन) जी ३० ऑगस्ट, १९७५ रोजी वनाचा भाग असलेली किंवा वनात समाविष्ट असलेली अथवा जी वनाचा भाग होती किंवा वनामध्ये व्याप्त होती अशी जमीन;

(तीन) राज्य शासनाकडून वन जमीन म्हणून जाहीर करण्यात येईल अशी वनामध्ये समाविष्ट असलेली किंवा त्याच्या लगत असलेली कुरणाची, पाणथळाची किंवा लागवडयोग्य असलेली किंवा लागवडीस अयोग्य असलेली जमीन;

(चार) शेतीसाठी किंवा त्याच्याशी निगडित असलेल्या अशा कोणत्याही प्रयोजनासाठी धारण केलेली किंवा भाड्याने दिलेली वन जमीन;

(पाच) तिच्यातील सर्व वनोत्पादने,–मग ती उभी असोत, पाडलेली असोत, आढळून आलेली असोत;]

(घ) ''वन अधिनियम'' याचा अर्थ,महाराष्ट्र राज्यास लागू असलेला असा भारतीय वन अधिनियम, १९२७ (१९२७ चा १६), असा आहे.

(ङ) ''विहित'' याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे;

(च) ''खाजगी वन'' याचा अर्थ, शासनाची मालमत्ता नसेल असे कोणतेही वन, असा आहे आणि त्यामध्ये पुढील गोष्टींचा समावेश होतो:–

(एक) वन अधिनियमाच्या कलम ३४-क अन्वये नियत दिवसापूर्वी वन म्हणून जाहीर करण्यात आलेली कोणतीही वन जमीन असा आहे;

(दोन) ज्या कोणत्याही वनाच्या संबंधात वन अधिनियमाचे कलम ३५ च्या पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना नियत दिवसाच्या लगतपूर्वी अमलात असेल असे कोणतेही वन, असा आहे;

(तीन) ज्या कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, वन अधिनियमाच्या कलम ३५ च्या पोटकलम (३) अन्वये नोटीस काढण्यात आली असेल अशी कोणतीही जमीन, असा आहे; परंतु त्यामधून जिल्हाधिकारी विनिर्दिष्ट करील असे दोन हेक्टरपेक्षा अधिक नसेल असे क्षेत्र वगळण्यात येईल;

(चार) ज्या जमिनीच्या संबंधात वन अधिनियमाच्या कलम ३८

अन्वये अधिसूचना काढण्यात आलेली असेल अशी वन जमीन, असा आहे;

(पाच) ज्या बाबतीत राज्य शासनाचा आणि इतर कोणत्याही व्यक्तीचा, त्या वनात संयुक्तरीत्या हितसंबंधित असेल त्याबाबतीत, अशा वनातील अशा व्यक्तींचा हितसंबंध, असा आहे;

(सहा) वनांच्या सोयीस्कर उपभोगासाठी किंवा वापरासाठी ज्या आवश्यक असल्याचे मानण्यात येत असेल अशा वनांमध्ये बांधण्यात आलेल्या, निवास, घरांच्या जागा आणि त्यांच्याशी अनुलग्न असलेल्या जमिनी, असा आहे;

(छ) "न्यायाधिकरण" याचा अर्थ, या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेले किंवा रचना केली असल्याचे समजण्यात येणारे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण, असा आहे;

(ज) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना या संहितेत, किंवा, यथास्थिति, वन अधिनियमात जे अर्थ नेमून देण्यात आले असतील अनुक्रमे तेच अर्थ असतील.

## टिप्पणी

अधिनियमाच्या कलम २ मध्ये व्याख्या देण्यात आलेल्या विविध संज्ञांचे उच्च न्यायालयाच्या पूर्ण पिठाने **जानू चंद्र वि. महाराष्ट्र राज्य** या प्रकरणात स्पष्टीकरण दिले आहे. अधिनियमाच्या खंड २ (ग–एक) मध्ये व्याख्या देण्यात आलेल्या "वन" या संज्ञेच्या बाबतीत पूर्ण पीठाने परिच्छेद २२ ते २५ मध्ये स्पष्टीकरण दिले आहे. यातील परिच्छेद २५ मध्ये स्पष्टीकरण दिले आहे. यातील परिच्छेद २५ मध्ये या बाबतीत दिलेले महत्त्वाचे निष्कर्ष पुढीलप्रमाणे आहेत:

'म्हणून व्याख्येच्या समावेशक भागातील उपखंड (एक) ते (चार) खालील 'वन' या संज्ञेच्या व्याख्येत समाविष्ट करण्याची मागणी केलेल्या जमिनीच्या प्रकारात नैसर्गिक वनांचा दुरान्वयानेसुद्धा संबंध नाही; मात्र नैसर्गिक वनांचा उल्लेख करण्याजोगा भाग ज्यांच्या ताब्यात आहे किंवा ज्या त्याच्याशी संबंधित आहेत किंवा त्याच्याशी संबंध जोडण्याजोग्या आहेत अशा वनांचा त्यात संबंध आहे आणि म्हणून त्यात जर काही कृत्रिमता असेल, तर त्याचा राज्य शासन ज्या बाबतीत सक्षम नाही अशा गोष्टींशी संबंध जोडता येणार नाही असे आमचे मत आहे."

अधिनयमाच्या कलम २ (च) मध्ये व्याख्या देण्यात आलेला 'खासगी वन' या संज्ञेचा विचार आणि त्याचे स्पष्टीकरण **चिंतामणी गजानन वेलकर वि. महाराष्ट्र राज्य** (२०००-३ एस.सी.सी १४३ = २००० (३) मुंबई क्राईम रिपोर्ट २२१-

एस सी = २००० (२) महाराष्ट्र लॉ रिपोर्टर २८७ एस सी = ए आय आर २००० एस सी १०७३)

या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने केले आहे. न्यायालयासमोरील प्रश्न असा होता की, अपीलकर्त्याची जमीन अधिनियमाच्या कलम २ (च) च्या उपखंड (तीन) च्या कक्षेत येते काय? खऱ्या विरोधाभासाचा निर्णय न्यायालयापुढे निर्माण झालेला आनुषंगिक मुद्दा असा होता की, अधिनियमाच्या कलम २ (च) मध्ये वापरलेल्या काढणे या संज्ञेचा अर्थ जमीन मालकाला नोटीस काढणे असा होता काय?

सर्वोच्च न्यायालयाने खालच्या न्यायालयाचा दृष्टिकोन मान्य करताना त्याच्या आदेशात फेरफार केला आणि असा निदेश दिला की, अपीलकर्ता कोणती दोन हेक्टर जमीन ठेवून घेऊ शकतो ते उपजिल्हाधिकाऱ्याने विनिर्दिष्ट करावे; कलम २ (च) च्या निर्वचनाच्या संबंधातील निरीक्षणाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे :-

१. कलम २ (च) (दोन) आणि कलम २ (च) (तीन) यांमध्ये जितपत संबंध आहे तितपत, त्यामध्ये, भारतीय वन अधिनियम. १९२७ याच्या कलम ३५ (१) अन्वये ज्यांच्या संबंधात नोटिसा काढण्यात आल्या आहेत अशा विविध जमिनींच्या त्यामध्ये निर्देश असतो

२. मात्र कलम २(च) चा उपखंड (तीन) मध्ये, भारतीय वन अधिनियम, १९२७ याच्या कलम ३५(१) अन्वये काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेचा कोणताही निर्देश नाही. यामध्ये फक्त कलम ३५ च्या पोटकलम (३) अन्वये प्रारंभी देण्यात येणाऱ्या नोटिशीचा निर्देश आहे.

३. सामान्यपणे नोटीस कलम ३५ (३) अन्वये काढावयाची असते आणि ती जमीनमालकावर बजावावयाची असते. त्यावरील आक्षेप ऐकावयाचे असतात आणि कलम ३५(१) अन्वये अधिसूचना काढण्यात आल्यानंतरच त्या जमिनी वनजमिनी असल्याबाबतचा आदेश काढता येतो.

**३. खासगी वने राज्य शासनाकडे निहित होणे.**

(१) त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही निवाड्यात, मंजुरीत, करारनाम्यात, परिपाठात, रूढीत किंवा कोणत्याही न्यायालयाच्या, न्यायाधिकरणाच्या किंवा प्राधिकरणाच्या कोणत्याही हुकूमनाम्यात किंवा आदेशात अथवा इतर कोणत्याही दस्तऐवजात काहीही अंतर्भूत असले तरी, नियत दिवशी आणि त्या दिवसापासून राज्यातील सर्व खासगी वने, संपादन करण्यात येतील आणि ती सर्व भारांपासून मुक्त, राज्य शासनाकडे निहित होतील आणि त्यांच्यावरील किंवा त्यांच्याशी निगडित असलेल्या सर्व अधिकारांसह ती, राज्य शासनाची मालमत्ता असल्याचे समजण्यात येईल आणि उक्त दिवशी अशा कोणत्याही वनामध्ये अस्तित्वात असलेले मालकाचे किंवा शासनाखेरीज अन्य कोणत्याही व्यक्तीचे सर्व अधिकार, हक्क आणि हितसंबंध, निर्वाचित

झाले असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट भोगवटादाराने किंवा कुळाने जी जमीन धारण केली असेल आणि नियत दिवसास जी कायदेशीररीत्या लागवडीखाली असेल आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या, महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ (१९६१ चा महा. २७) याच्या कलम ५ मध्ये तरतूद केलेल्या कमाल मर्यादा क्षेत्रापेक्षा अधिक नसेल अशी जमीन किंवा तिच्यावर उभारलेली किंवा तिच्याशी अनुलग्न असलेली कोणतीही इमारत किंवा संरचना याखाली खाजगी वनात व्याप्त असलेल्या जमिनीच्या मर्यादेपर्यंत लागू असणार नाही.

(३) पोटकलम (१) अन्वये राज्य शासनाकडे निहित झालेली सर्व खाजगी वने, वन अधिनियमाच्या अर्थानुसार राखीव वने असल्याचे मानण्यात येतील.

**४. खासगी वने संपादित केल्यानंतर शासनाने करावयाची उपाययोजना.**

खासगी वने संपादित केल्यानंतर, राज्य शासन, शास्त्रीय तत्त्वावर वनरोपण करणे. कुरणांसह जमिनीचा विकास करणे, आणि त्यांच्या क्षमतेनुसार त्यांचा वापर करणे, शास्त्रीय तत्त्वावर झाडे तोडण्याचे नियमन करणे, शेतीकरिता अधिकाधिक उपयोगी पडेल अशा रीतीने मृद व जल संधारणा करण्यास चालना देणे यांसाठी [१][सार्वत्रिक हितासाठी उपयोगात आणता येईल अशा परिपक्व समुपयोजनयोग्य वन उत्पादनाचे वितरण करण्यासाठी आणि खास करून राज्यातील शेतीच्या व शेतकऱ्यांच्या सर्वोत्तम हितसंवर्धनार्थ हाती घेतलेल्या योजनांसाठी वन जमिनीमध्ये शास्त्रीय पद्धतीने वनझाडे लावण्याची उपाययोजना हाती घेईल किंवा उपाययोजना हाती घेण्याची तजवीज करील. अशा योजनांमध्ये, राज्यातील शेतीच्या व शेतकऱ्यांच्या आणि विशेषत: समाजातील दुर्बल घटकांच्या सर्वोत्तम हितसंवर्धनार्थ, वन उत्पादनांचा वापर करण्याचीदेखील तरतूद करील. उदाहरणार्थ, भूमिहिन व्यक्तींना झोपड्या बांधण्यासाठी साहाय्य करण्याची योजना, गुरांचे गोठे, शेतीची अवजारे, बैलगाड्या, घरे, फळबागांसाठी ढकलगाड्या व टेकू (आधार) यांकरिता इमारती लाकडे पुरविण्याची योजना, खतांसाठी व वैरणीसाठी पाने, कुंपणाकरिता काटे, गुरांसाठी गवत व गुरेचराई आणि सेवन करण्यासाठी खास वनोत्पादने, यांकरिता वनोत्पादनाचा वापर करण्याच्या योजना, आदिवासींसाठी व इतरांसाठी वनोत्पादनावर आधारित रोजगाराच्या संधीत वाढ करण्याच्या योजना आणि इंधनाची (जळणाची) गरज भागविण्याच्या योजना करील किंवा करण्याची व्यवस्था करील.]

---

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२ याच्या कलम ४ ...

[1][५. खासगी वने ताब्यात घेण्याचा अधिकार.

जेव्हा अधिनियमाच्या तरतुदीन्वये कोणतेही खासगी वन, संपादित केले असेल व राज्य शासनाकडे निहित झाले असेल, तेव्हा याबाबतीत राज्य शासनाने प्राधिकृत केलेली व्यक्ती किंवा जिल्हाधिकारी, त्यात प्रवेश करील आणि ते ताब्यात घेईल आणि जर कोणतीही व्यक्ती असा ताबा घेण्यास प्रतिकार करील तर, ज्यास ती पात्र असेल अशा अन्य कोणत्याही कारवाईस बाध न येता, ती आवश्यक असेल त्याप्रमाणे अशा वनाचा वापर करण्यापासून दूर केली जाण्यास पात्र असेल.]

**६. विवाद आपसात मिटविणे.**

कोणतेही वन हे खासगी वन आहे किंवा कसे, अथवा कोणतेही खासगी वन किंवा त्याचा भाग राज्य शासनाकडे निहित झाला आहे किंवा कसे, अथवा एखाद्या वनात बांधण्यात आलेले कोणतेही निवासी घर हे या अधिनियमान्वये संपादित करण्यात आले आहे किंवा कसे याबाबतीत कोणतेही प्रश्न निर्माण झाल्यास, जिल्हाधिकारी, त्या प्रश्नावर निर्णय देईल आणि जिल्हाधिकाऱ्याने निर्णय दिल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत न्यायाधिकरणाकडे दाखल करता येईल अशा अपिलावरील न्यायाधिकरणाच्या निर्णयास किंवा कलम १८ अन्वये राज्य शासनाच्या आदेशास अधीन राहून जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय, अंतिम असेल.

**७. खासगी वनांच्या मालकांस रक्कम देणे.**

(१) या अधिनियमाच्या तरतुदीन्वये जे खासगी वन राज्यशासनाकडे निहित झाले असेल अशा खासगी वनाच्या प्रत्येक मालकास, अशा वनामध्ये अंतर्भूत असलेल्या जमिनीच्या वनांच्या प्रती हेक्टरच्या आकारणीच्या वीसपट इतकी असेल इतकी रक्कम आणि निवासी घरांच्या बाबतीत, अशा मालकांस, भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) याच्या कलम २३ व कलम २४ यांच्या तरतुदींनुसार हिशोब करण्यात आलेली रक्कम, राज्य शासनाकडून देण्यात येईल.

(२) जर कोणत्याही जमिनीची आकारणी करण्यात आलेली नसेल तर, या कलमाच्या प्रयोजनार्थ, आकारणीची रक्कम ही, त्याच क्षेत्रातील तशाच स्वरूपाच्या वन जमिनीच्या तितक्याच मर्यादेसाठी असलेली आकारणीची जी रक्कम वसुलीयोग्य झाली असती तितकी रक्कम विचारात घेऊन, जिल्हाधिकाऱ्याद्वारे निर्धारित करण्यात येईल.

**८. रक्कम मिळण्याबाबत अर्ज.**

कलम ७ अन्वये रक्कम मिळण्यास हक्कदार असणारा खाजगी वनाचा कोणताही

१. १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७२ याच्या कलम ५ द्वारे कलम ५ ऐवजी दाखल केला.

मालक, नियत दिवसापासून सहा महिन्यांच्या आत, कलम ७ अन्वये त्याला प्रदेय असलेली रक्कम निर्धारित करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करील.

**९. जिल्हाधिकाऱ्याने रक्कम निर्धारित करणे.**

(१) कलम ८ खालील अर्ज प्राप्त झाल्यावर, जिल्हाधिकारी, संहितेत तरतूद केलेल्या रीतीने, योग्य ती चौकशी केल्यावर, कलम ७ अन्वये मालकास प्रदेय असलेली रक्कम निर्धारित करणारा निर्णय देईल.

(२) पोटकलम (१) अन्वये निवाडा देणारा अधिकारी, या अधिनियमान्वये जिल्हाधिकारी असेल; परंतु, या संहितेच्या कलम ७ अन्वये नियुक्त केलेला जिल्हाधिकारी नसेल आणि अशा निवाड्याची रक्कम, पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक होत असेल त्या बाबतीत, संहितेच्या कलम ७ अन्वये नियुक्त केलेल्या जिल्हाधिकाऱ्याची पूर्वमान्यता घेतल्याखेरीज निवाडा देण्यात येणार नाही.

**१०. ज्या रीतीने रक्कम देण्यात येईल ती रीत.**

(१) निवाड्यात, विनिर्दिष्ट केलेली रक्कम, ती मिळण्यास हक्कदार असलेल्या व्यक्तीला रोख स्वरूपात देण्यात येईल.

(२) जेव्हा खाजगी वनाचा भोगवटा घेण्याच्या वेळी किंवा त्यापूर्वी निवाड्याची रक्कम प्रदान करण्यात आलेली नसेल तेव्हा, निवाड्याची रक्कम, भोगवटा घेण्याच्या वेळेपासून ते रक्कम प्रदान करण्याच्या वेळेपर्यंतच्या कालावधीसाठी दर साल दर शेकडा ४ टक्के दराने व्याजासह प्रदेय असेल.

**११. मालकास प्रदेय असलेल्या रकमेतून बोजाची रक्कम वजा करणे.**

(१) कलम ९ अन्वये करण्यात आलेल्या चौकशीमध्ये, जिल्हाधिकारी विवादास्पद खाजगी वनांवर, नियत दिवशी कायदेशीरपणे अस्तित्वात असलेल्या, कोणतेही असल्यास, बोज्याची रक्कम विहित केलेल्या रीतीने, निर्धारित करील.

(२) (क) जर अशा बोज्यांची एकूण रक्कम ही, मालकाला प्रदेय असल्याचे निर्धारित करण्यात आलेल्या रकमेपेक्षा कमी असेल तर, बोजांची रक्कम, मालकाला प्रदेय असल्याचे निर्धारित केलेल्या रकमेतून वजा करण्यात येईल. त्यानंतर शिल्लक रक्कम मालकाला देण्यात येईल, आणि अशा रीतीने वजा करण्यात आलेल्या रकमेचा विनियोग बोज्यांचे प्रदान करण्यासाठी करण्यात येईल; आणि

(ख) जर बोजाची एकूण रक्कम ही, मालकाला प्रदेय असल्याचे निर्धारित करण्यात आलेल्या रकमेइतकी किंवा त्यापेक्षा अधिक असेल तर, मालकाला प्रदेय असणारी रक्कम बोजाधारकांमध्ये, त्यांच्या बोज्याच्या संबंधित रकमांच्या प्रमाणात आणि अशा बोजाधारकांच्या हक्क मागण्यांच्या प्राधान्य क्रमानुसार, त्यांच्याशी परस्परविचार

करून, वाटण्यात येईल :

परंतु, जर खाजगी वनाच्या मालकाकडून राज्य शासनास कोणतीही रक्कम येणे असेल तर, राज्य शासनाकडून अशा मालकाला प्रदेय असलेल्या रकमेतून प्रथम अशी रक्कम समायोजित करण्यात येईल आणि केवळ अशी जादा रक्कम खंड (क) अन्वये मालकाला द्यावयाची शिल्लक रक्कम म्हणून, किंवा, यथास्थिति, खंड (ख) अन्वये बोजाधारकांमध्ये वाटप करावयाची राहिलेली रक्कम म्हणून उपलब्ध असेल.

(३) कोणत्याही बोज्याच्या विधिग्राह्यतेसंबंधीचा कोणताही कायदेविषयक प्रश्न किंवा कोणत्याही बोजाधारकांच्या हक्क मागणीचा प्रश्न किंवा बोज्यापोटी धारकाला प्रदेय असणाऱ्या रकमेसंबंधीचा कोणताही प्रश्न अंतर्भूत असलेल्या या कलमाखालील कोणत्याही वादप्रश्नावर निर्णय देताना, जिल्हाधिकारी, ज्याच्या अधिकारितेच्या प्रादेशिक सीमेत असे वन येत असेल त्या सीमेतील संबंधित दिवाणी न्यायाधीशांकडे असा वादप्रश्न विहित रीतीने, निर्णयार्थ, निर्देशित करील. अशा प्रकारे निर्देश करण्यात आल्यानंतर, संबंधित न्यायाधीश, संबंधित पक्षकारांना, नोटीसा दिल्यानंतर, त्यांच्याकडे निर्देशित केलेल्या प्रश्नांची न्यायचौकशी करील आणि त्यावरील निष्कर्ष नोंदवील आणि तो वाद जिल्हाधिकाऱ्याकडे पाठवील. त्यानंतर, जिल्हाधिकारी, उक्त निष्कर्षानुसार निर्णय देईल.

(४) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, अशा कोणत्याही बोजाधारकांच्या, खाजगी वनाच्या मालकाविरुद्ध आपला अधिकार अमलात आणण्यासाठी, अन्य कोणत्याही रीतीने, किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये कार्यवाही करण्याच्या अधिकारांवर प्रतिकूल परिणाम होणार नाही.

**१२. इतर व्यक्तींचे हक्क रद्द करण्यासाठी रक्कम देणे.**

(१) एखांद्या खासगी वनाच्या मालकाखेरीज इतर कोणतीही व्यक्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीमुळे, ती सर्वसामान्य जनतेतील व्यक्ती असेल ते खेरीजकरून, ती वापरात असलेले कोणतेही हक्क रद्द झाल्यामुळे व्यथित झाली असेल तर, आणि जर अशी व्यक्ती, अशा रद्द केल्यामुळे असा हक्क राज्य शासनाकडे किंवा सार्वजनिक मालकीत हस्तांतरित होतो असे सिद्ध करील तर, अशा व्यक्तीला असे रद्द केल्याबद्दल रक्कम मिळण्यासाठी जिल्हाधिकाऱ्याकडे अर्ज करता येईल.

(२) असा अर्ज, नियत दिवसापासून सहा महिन्यांच्या आत करण्यात येईल.

(३) पोटकलम (१) खालील अर्ज मिळाल्यानंतर, जिल्हाधिकारी, या संहितेत तरतूद केलेल्या रीतीने, योग्य ती चौकशी केल्यानंतर, तसेच संबंधित खासगी वनाच्या मालकास आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, संयुक्तिक वाटेल अशी रक्कम, अर्जदारास देण्याचा निवाडा देईल.

(४) अर्जदाराला अशा रीतीने निवाड्याद्वारे देण्यात आलेली रक्कम ही, अशा खाजगी वनाच्या मालकास, कलम ७ अन्वये प्रदेय असल्याचे निर्धारित करण्यात आलेल्या रकमेमधून वजा केली जाण्यास पात्र असेल.

**१३. अपील.**

या संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ९ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या निवाड्याविरुद्ध किंवा कलम ११ किंवा १२ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाविरुद्ध न्यायाधिकरणाकडे अपील दाखल करता येईल.

**१४. न्यायाधिकरणासमोरील कार्यपद्धती.**

(१) उभय पक्षकारांना नोटीसा दिल्यानंतर, न्यायाधिकरण, अपिलावर निर्णय घेईल आणि आपल्या निर्णयाची नोंद करील.

(२) या अधिनियमाखालील अपिलावर निर्णय देताना, न्यायाधिकरण, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ (१९०८ चा ५) अन्वये मूळ न्यायालयाच्या हुकूमनाम्याविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध केलेल्या अपिलांवर निर्णय देताना दिवाणी न्यायालयास जे अधिकार असतात त्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि ते न्यायालय अनुसरत असलेल्या कार्यपद्धतीचे अनुसरण करील.

**१५. मुदत मर्यादा.**

कलम ६ मध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याखेरीज करून या अधिनियमान्वये न्यायाधिकरणाकडे करण्यात आलेले प्रत्येक अपील, जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या निवाड्याच्या, किंवा यथास्थिती, आदेशाच्या तारखेपासून आठ दिवसांच्या कालावधीत दाखल करण्यात येईल. असे अपील दाखल करण्यासाठी मुदत अधिनियम, १९६३ (१९६३ चा ३६) याची कलमे ४, ५, १२ आणि कलम १४ च्या तरतुदी लागू होतील.

**१६. न्यायालयीन शुल्क.**

मुंबई न्यायालयीन शुल्क अधिनियम, १९५९ (१९५९ चा मुंबई २५) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये न्यायाधिकरणाकडे करण्यात आलेल्या प्रत्येक अपिलावर, पाच रुपयांचे न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल.

**१७. निवाड्याचा व न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असणे.**

कलम ९ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेला निवाडा आणि कलम ११ किंवा १२ अन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेला आदेश, न्यायाधिकरणाकडे करावयाच्या अपिलाच्या किंवा कलम १८ खालील राज्य शासनाच्या आदेशास आणि अपिलावरील

न्यायाधिकरणाच्या निर्णया अधीन राहून अंतिम व निर्णायक असतील, आणि त्यांवर कोणत्याही न्यायालयात दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्याद्वारे हरकत घेण्यात येणार नाही.

**१८. पुनरीक्षण.**

जेव्हा जिल्हाधिकाऱ्याचा कोणताही निर्णय, आदेश किंवा निवाडा याविरुद्ध, त्यासाठी तरतूद केलेल्या कालावधीत कोणतेही अपील दाखल करण्यात आलेले नसेल तेव्हा, राज्य शासनास, अशा निर्णयाच्या, आदेशाच्या किंवा निवाड्याच्या तारखेपासून एक वर्षापेक्षा अधिक असणार नाही, अशा कालावधीत–

(क) जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाच्या, आदेशाच्या किंवा निवाड्याच्या वैधतेविषयी किंवा औचित्याविषयी आणि, यथास्थिति, कार्यवाहीच्या नियमिततेसंबंधी स्वत:ची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ, जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही चौकशीचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागविता येईल; आणि

(ख) त्यास योग्य वाटेल असा आदेश त्यावर देता येईल :

परंतु, हितसंबंधित असलेल्या पक्षकारांना उपस्थित राहून आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय, जिल्हाधिकाऱ्याच्या कोणत्याही निर्णयात, आदेशात किंवा निवाड्यात फेरबदल करण्यात येणार नाही, त्याचे विलोपन करण्यात येणार नाही किंवा तो फिरवण्यात येणार नाही.

## टिप्पणी

या कलमान्वये जेथे अपील करण्यात आले नसेल अशा बाबतीत राज्य शासनाला पुनरीक्षणाचे हे अधिकार निर्णयाच्या तारखेपासून एका वर्षांच्या आत वापरले पाहिजेत.

आयुक्ताने कार्यवाहीची मुदत मर्यादा समाप्त झाल्यावर कलम १८ अन्वये केलेल्या कृतीला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. याबाबतीत मुदत मर्यादा समाप्त झाल्यानंतर करण्यात आलेली कृती ही अधिकारिता बाह्य ठरते, असा निर्णय देण्यात आला.

पहा - **याकुब हाजी वि. महाराष्ट्र राज्य, १९९६ (१)** महाराष्ट्र लॉ जर्नल १७१ विभागीय **न्यायपीठ = १९९६ (२) मुंबई सी आर ४२.**

**१९. जिल्हाधिकारी आणि न्यायाधिकरण यांच्यापुढील चौकशी व कार्यवाही ही न्यायिक कार्यवाही असणे.**

या अधिनियमान्वये जिल्हाधिकारी व न्यायाधिकरण यांच्यापुढे चालणारी सर्व चौकशी व कार्यवाही ही, भारतीय दंड संहितेची (१८६० चा ४५) कलमे १९३,

२१९ व २२८ यांच्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे समजण्यात येईल.

**२०. क्षतिपूर्ती.**

या अधिनियमान्वये सद्‌भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे उद्देशित असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी राज्य शासन, न्यायाधिकरण किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर न्यायालयीन कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही.

**२१. विवक्षित जमिनी या खासगी वने म्हणून जाहीर करणे.**

(१) जेव्हा केव्हा शासनाची मालमत्ता नसणाऱ्या कोणत्याही जमिनीच्या पट्ट्यात झाडे-झुडपे किंवा कुरण जमिनी यांनी व्याप्त जमीन अथवा इतर कोणत्याही प्रकारची जमीन आहे, आणि सार्वजनिक हिताच्या दृष्टीने व या अधिनियमाची उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीने, तिला खासगी वन म्हणून जाहीर करावे, असे राज्य शासनास दिसून येईल तेव्हा राज्य शासन,

(क) जमिनीचा असा पट्टा, खाजगी वन म्हणून जाहीर करण्याचे प्रस्तावित केले आहे असे जाहीर करणारी; आणि

(ख) अशा जमिनीच्या भूपट्ट्याचे स्थान व सीमा, शक्य तितक्या अचूकपणे निर्दिष्ट करणारी;

अधिसूचना, शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करील.

(२) अशी अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर, जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाकडून या बाबतीत प्राधिकृत करण्यात येईल असा अन्य कोणताही अधिकारी, अशा जमिनीच्या पट्ट्याच्या मालकास आणि जमिनीच्या अशा पट्ट्यात हितसंबंध असणाऱ्या इतर सर्व व्यक्तींना असे जाहीर का करण्यात येऊ नये, याचे कारण या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी वाजवी कालावधीत देण्यास सांगणारी, नोटीस काढील.

(३) मालक व इतर व्यक्ती यांचे आक्षेप, कोणतेही असल्यास, ऐकून घेतल्यानंतर आणि त्याच्या पुष्ट्यर्थ ते सादर करतील असा कोणताही पुरावा विचारात घेतल्यानंतर, जिल्हाधिकारी, किंवा, यथास्थिति, असा प्राधिकृत केलेला अधिकारी, आपला अहवाल, जमिनीचा असा पट्टा खाजगी वन म्हणून जाहीर करावा किंवा करू नये, याविषयीचे आक्षेप, त्यावरील कार्यवाही व स्वतःचे अभिप्राय यांसह राज्य शासनास सादर करील.

(४) आक्षेप, कार्यवाही आणि जिल्हाधिकारी, किंवा, यथास्थिति, प्राधिकृत अधिकारी यांचा अहवाल व अभिप्राय विचारात घेतल्यानंतर, राज्य शासन, जमिनीचा असा भूपट्टा किंवा त्याचा कोणताही भाग, खाजगी वन म्हणून जाहीर करावा किंवा करू नये, त्याबाबत निर्णय घेईल आणि त्यावरील असा निर्णय अंतिम असेल.

(५) जर असा जमिनीचा भूपट्टा किंवा त्याचा कोणताही भाग, खाजगी वन म्हणून जाहीर करण्याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला असेल तर, राज्य शासन, असा निर्णय शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे प्रसिद्ध करील.

(६) पोटकलम (५) खालील अधिसूचना प्रसिद्ध केल्यानंतर, विवादास्पद जमिनीचा असा पट्टा किंवा त्याचा कोणताही भाग, खाजगी वन असल्याचे मानण्यात येईल, आणि त्यानंतर, पोटकलम (५) अन्वये त्या संबंधातील नियत दिवस हा, शासकीय राजपत्रातील अधिसूचना काढल्याची व ती प्रसिद्ध केल्याची तारीख असल्याचे मानण्यात येईल. या फेरबदलाच्या अधीन राहून, या अधिनियमाच्या सर्व तरतुदी त्याला लागू होतील.

(७) जर जमिनीचा असा भूपट्टा किंवा त्याचा भाग, खाजगी वन म्हणून जाहीर न करण्याचा राज्य शासनाने निर्णय घेतला असेल तर, राज्य शासन, आपला निर्णय त्या जमिनीच्या भूपट्ट्यात किंवा त्याच्या कोणत्याही भागात हितसंबंध असणाऱ्या सर्व व्यक्तींना कळवील.

(८) कोणत्याही जमिनीच्या पट्ट्याबाबत पोटकलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर, जमिनीच्या अशा भूपट्ट्याच्या किंवा त्याच्या भागाच्या मालकाने किंवा कोणत्याही व्यक्तीने, विभागीय वन अधिकाऱ्याची लेखी पूर्व परवानगी घेतल्याशिवाय, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी किंवा कलम (५) अन्वये ज्या तारखेस अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल त्या तारखेपर्यंतचा, किंवा, यथास्थिति, पोटकलम (७) अन्वये ज्या तारखेस निर्णय कळविण्यात येईल त्या तारखेपर्यंतचा कालावधी, यांपैकी जो कालावधी आधी संपेल त्या कालावधीसाठी त्या जागेत पुढीलपैकी कोणतीही गोष्ट करणे कायदेशीर असणार नाही :-

(क) लागवडीसाठी वनांची तोड किंवा झाडे तोडून जमिनीची साफसफाई करणे;

(ख) गुरे चारणे;

(ग) वनस्पती, इत्यादी जाळणे किंवा त्यांची साफसफाई करणे;

(घ) कोणत्याही झाडाच्या खोडाभोवती कडे करणे, किंवा त्याला खाप पाडणे; किंवा ते जळणे किंवा कोणत्याही झाडांच्या साली किंवा पाने काढणे;

(ङ) झाडाच्या फांद्या तोडणे व त्याचा वरचा भाग छाटणे;

(च) झाडे व इमारती लाकडांची झाडे तोडणे, कापणे, त्यांचे रूपांतर करणे आणि ती हलवणे.

(छ) खाणीतून दगड काढणे किंवा चुना (लाईम) किंवा कोळसा (चारकोल) भाजणे किंवा कोणतेही वन उत्पादन गोळा करणे किंवा हलवणे किंवा त्यावर

कोणतीही वस्तुनिर्मितीची प्रक्रिया करणे,

(९) पोटकलम (८) च्या तरतुदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती, अपराध सिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल, इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस किंवा द्रव्यदंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षेस पात्र होईल.

[१][२१क. विवक्षित उपरोक्त जमिनी वाचविणे.

कलम २१ मधील कोणतीही गोष्ट, ज्या जमिनीवर कृत्रिम साधनाद्वारे किंवा मानवी यंत्रणेद्वारे, वन झाडांच्या जातींची लागवड करून वन रोपण केलेले आहे अशा, शासनाची मालमत्ता नसणाऱ्या कोणत्याही, वनेतर जमिनीस लागू असणार नाही.]

**२२. खासगी वनाच्या मालकाने अभिलेख प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या स्वाधीन करणे.**

(१) जेव्हा केव्हा या बाबतीत राज्य शासनाकडून प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याकडून तसा निदेश देता येईल तेव्हा, राज्य शासनाकडे निहित झालेल्या खासगी वनांच्या मालकाने या अधिनियमाच्या तरतुदींन्वये अशा खासगी वनांच्या संबंधात त्याने ठेवलेला अभिलेख, अशा अधिकाऱ्याच्या किंवा निदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर अधिकाऱ्यांच्या स्वाधीन केला पाहिजे.

(२) जर मालकाने वाजवी कारणाखेरीज असा कोणताही अभिलेख स्वाधीन करण्यात कसूर केली असेल तर, त्यास अपराधसिद्धीनंतर दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची व असा कोणताही अभिलेख स्वाधीन करण्यात कसूर करण्याचे चालू ठेवल्यास, त्यास, अशा पहिल्या अपराधसिद्धीनंतर अशी कसूर करण्याचे चालू ठेवण्याच्या मुदतीकरिता प्रत्येक दिवसासाठी पंचवीस रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या जास्तीच्या द्रव्यदंडाची, शिक्षा करण्यात येईल.

[२][२२क. विवक्षित परिस्थितीत मालकाला वन जमिनी परत करणे.

(१) या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर, महाराष्ट्र खासगी वने (संपादन) (सुधारणा) अधिनियम, १९७८ च्या प्रारंभाच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत, खासगी वनाच्या कोणत्याही मालकाने अर्ज केल्यावरून, किंवा जिल्हाधिकाऱ्याने, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, स्वतः होऊन, कोणत्याही वेळी, जर मालकाने धारण केलेली वन जमीन ही, या अधिनियमाने त्याची वन जमीन संपादन केल्यामुळे नियत दिवशी बारा हेक्टरपेक्षा कमी झाली असल्याबद्दल किंवा या अधिनियमान्वये त्याची वन जमीन संपादन केल्यामुळे नियत दिवसाच्या लगतपूर्वी,

---

१. सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम २ द्वारे समाविष्ट केले.
२. सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ याच्या कलम ३ द्वारे समाविष्ट केले.

अशा मालकाने धारण केलेली एकूण जमीन ही बारा हेक्टरपेक्षा कमी झाली असल्याबद्दल त्याची खात्री पटली असेल तर, जिल्हाधिकारी, नियत दिवशी त्याच्याजवळ असलेली त्याची एकूण धारण जमीन बारा हेक्टर्सपेक्षा अधिक होणार नाही अशा प्रकारे, अशा मालकाकडून संपादन केलेली संपूर्ण वन जमीन किंवा तिचा कोणताही भाग त्याला परत करावयाची किंवा कसे, हे निश्चित करील.

(२) खासगी वनाच्या कोणत्याही मालकास परत करावयाच्या जमिनीचे क्षेत्र व स्थान जिल्हाधिकाऱ्याने निश्चित केल्यानंतर, जिल्हाधिकारी, त्याने काढलेल्या आदेशाच्या तारखेपासून, जी संपादित केलेली होती आणि राज्य शासनामध्ये निहित झाली होती, अशी जमीन त्यात विनिर्दिष्ट करील आणि अशी जमीन ही, वन अधिनियमाच्या अर्थांतर्गत राखीव वन असण्याचे बंद होईल व ती त्या मालकाला परत देण्यात आली असल्याचे आणि त्याच्यामध्ये निहित झाली असल्याचे समजण्यात येईल असा आदेश काढील. तथापि, नियत दिवसाच्या लगतपूर्वीच्या दिवशी अशा जमिनीवर, कायदेशीर बोजा कोणताही असल्यास, पुनरुज्जीवित होऊन त्या जमिनीवर कायम राहील. अशा प्रकारे परत केलेल्या जमिनीचा भोगवटा, व्यवहार्य असेल त्या परिस्थितीत, आदेशाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत, जिल्हाधिकारी मालकास देईल.

(३) कलम ७ अन्वये खाजगी वनाच्या मालकास प्रदेय असलेली रक्कम, त्याला किंवा बोजाधारकास प्रदान करण्यात आली असेल तर, जिल्हाधिकारी, कोणताही असल्यास बोजाधारकास प्रदान करण्यासाठीच्या वजावटी विचारात न घेता, पोटकलम (२) अन्वये त्याला परत केलेल्या जमिनीच्या बाबतीत, कलम ७ अन्वये जी कोणती रक्कम त्याला देण्यात आली असती ती रक्कम किंवा त्याला प्रदेय असलेली प्रमाणशीर रक्कम निर्धारित करील, आणि आदेशाद्वारे, मालकास असा आदेश प्राप्त झाल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या कालावधीत, अशा प्रकारे निर्धारित केलेली रक्कम राज्य शासनास परत करण्याचा मालकास निदेश देईल. जर अशी रक्कम वेळेत परत केली नसेल तर, जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे ती वसूल करण्यात येईल. जेव्हा कोणतीही देय असलेली रक्कम मालक राज्य शासनास परत करील तेव्हा, मालकामध्ये निहित झालेल्या जमिनीच्या बाबतीत, राज्य शासनाने त्याला केलेल्या कोणत्याही प्रदानासाठी, कोणताही बोजा असल्यास, बोजाधारकास द्यावयाच्या रकमेत आवश्यक ते समायोजन करण्याचा त्याला हक्क असेल.

(४) संहितेत किंवा या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमान्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध कोणतेही अपील करता येणार नाही, परंतु आयुक्त, किंवा राज्य शासन, असा निर्णय किंवा आदेश दिल्याच्या तारखेपासून एक वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कालावधीत,

(क) अशा निर्णयाच्या किंवा आदेशाच्या वैधतेबद्दल किंवा औचित्याबद्दल, आणि यथास्थिति, अशा कार्यवाहीच्या नियमितपणाबद्दल स्वत:ची खात्री पटविण्याच्या प्रयोजनार्थ जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या कोणत्याही चौकशीचा किंवा कार्यवाहीचा अभिलेख मागवू शकेल; आणि

(ख) त्यावर त्याला योग्य वाटेल असा आदेश संमत करू शकेल :

परंतु, हितसंबंधित व्यक्तींना उपस्थित राहून त्यांचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, अशा कोणत्याही निर्णयात किंवा आदेशात कोणताही फेरबदल करण्यात येणार नाही, तो रद्द करण्यात येणार नाही किंवा तो फिरविण्यात येणार नाही.

(५) जिल्हाधिकाऱ्याने, आयुक्ताच्या किंवा राज्य शासनाच्या पुनरीक्षणास अधीन राहून, त्या कलमान्वये घेतलेला कोणताही निर्णय किंवा दिलेला कोणताही आदेश, आणि पुनरीक्षणात आयुक्ताने किंवा राज्य शासनाने दिलेला कोणताही आदेश, अंतिम व निर्णायक असेल आणि त्याविरुद्ध कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीमध्ये आक्षेप घेण्यात येणार नाही.

(६) या कलमात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट, नियत दिवसाच्या लगतपूर्वी दगड खाणीमधील दगडासारख्या गौण खनिजांचे उत्खनन करण्यासाठी वापरात असलेल्या खाजगी वनातील कोणत्याही जमिनीस लागू असणार नाही. तदनुसार, अशी जमीन विचारात घेतली जाणार नाही आणि ती या कलमान्वये परत केली जाण्यास पात्र असणार नाही.]

## टिप्पणी

विशिष्ट परिस्थितीत वन जमिनीच्या मालकाला त्या जमिनीची मालकी परत देण्याच्या बाबतीतली तरतूद कलम २२ क द्वारे करण्यात आली आहे. मुकुंद शिवराम वि. महाराष्ट्र राज्य, २००१ (४) महाराष्ट्र लॉ जर्नल ६५६ विभागीय न्यायपीठ = २००१ (४) मुंबई सीआर ७००= २००० (१) महा. लॉ जर्नल ५६३ या प्रकरणात उच्च न्यायालयाने हे कलम लागू करण्याच्या व्याप्ती संबंधीचा विचार केला आहे. या प्रकरणात अपर आयुक्ताने कलम २२क अन्वये काढलेल्या आदेशाला आव्हान देण्यात आले होते. कालमर्यादा समाप्त झाल्याच्या कारणासाठी अपर आयुक्ताने पुनरीक्षणास नकार दिला होता. उच्च न्यायालयानेही विनंती अर्ज फेटाळला होता. असे म्हणण्यात आले होते की, अधिनियमाच्या कलम २२क (४) अन्वये पुनरीक्षण करणारा आयुक्त म्हणजे न्यायालय नाही आणि म्हणून मुदत मर्यादा अधिनियमाच्या तरतुदी याबाबतीत लागू होत नाहीत.

[1][२२ख. राज्यामध्ये निहित असलेल्या खासगी वन जमिनी विवक्षित प्रकरणी सार्वजनिक प्रयोजनासाठी देण्याचा जिल्हाधिकाऱ्याचा अधिकार.**

या अधिनियमाच्या कलम ४ मध्ये किंवा अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्यास, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये राज्य शासनामध्ये निहित असलेली कोणतीही खाजगी वन जमीन किंवा तिचा कोणताही भाग, कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनार्थ, अशा सार्वजनिक प्रयोजनार्थ, भूमि संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा १) अन्वये संपादन करण्यासाठी कोणतीही शासकीय जमीन उपलब्ध नसेल किंवा योग्य वाटत नसेल तरच केवळ हस्तांतरित करता येईल किंवा अन्य प्रकारे उपलब्ध करून देता येईल.]

**२३. नियम करण्याचा अधिकार.**

(१) राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे व पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींस अधीन राहून, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता, नियम करता येतील. या नियमांत, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनार्थ, शुल्क आकारण्याची तरतूद करता येईल.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनांत, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे एकमत होतील किंवा असा नियम करू नये, म्हणून दोन्ही सभागृहे एकमत होतील तर आणि असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या दिनांकापासून, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच ते नियम अमलात येतील, किंवा, यथास्थिति, मुळीच अमलात येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

१. सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५ याच्या कलम २ द्वारे कलम २२ख समाविष्ट केले.

## २४. वन अधिनियमाची कलमे ३४क ते ३७ यांचे निरसन.

[१][(१)] नियत दिवशी व त्या दिवसापासून वन अधिनियमाची कलमे ३४क, ३५, ३६क, ३६ख, ३६ग व ३७ निरसित होतील.

[२][(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) (सुधारणा) अधिनियम, १९७८ याच्या प्रारंभाच्या तारखेस व तेव्हापासून, वन अधिनियमाची कलमे ३४ क, ३५, ३६, ३६क, ३६ख, ३६ग व ३७ ही कलम २२क खालील पुनस्थापित जमिनीच्या बाबतीत, जणू काही ती निरसित करण्यात आलेली नाहीत असे समजून अशा जमिनीच्या बाबतीत, त्याच स्वरूपात पुनर्अधिनियमित करण्यात आली असल्याचे आणि तिच्याबाबतीत अमलात आली असल्याचे व लागू असल्याचे मानण्यात येतील.]

□□□